२१

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

## *** परिपत्रक क्र.१७० ***

**विषय: मजीप्राच्या कंत्राटदारांच्या नोंदणी व नूतनीकरणाबाबत.**

**संदर्भ:** १. प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दिनांक २२.०४.१९९२ रोजी झालेल्या ५७ व्या बैठकीचे इतिवृत्त.
२. प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दिनांक १७.०९.१९९८ रोजी झालेल्या ८१ व्या बैठकीचे इतिवृत्त.
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ९४, दिनांक १६.१०.२००३.
४. प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दिनांक २७.०१.२००४ रोजी झालेल्या ९६ व्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने निर्गमित केलेले पत्र मजीप्रा/अअ(मु.)/नोंदणी/१३७, दिनांक २२.०३.२००४.
५. प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दिनांक ०६.१०.२०१५ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही महाराष्ट्र शासनाची पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांची कामे करण्याकरीता, या संदर्भातील अधिकृत मार्गदर्शन करणे, पाणी पुरवठा संदर्भातले निकष तयार करणे, पाणी पुरवठा तसेच जलनि:सारण योजनांकरीता आवश्यक असलेली दरसूची तयार करणे इत्यादी कामांकरीता प्राधिकृत यंत्रणा आहे. या यंत्रणेमार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिनियम १९७६ नुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विषयीची कामे पार पाडली जातात.

प्राधिकरणामार्फत पार पाडण्यात येणारे पाणी पुरवठा तसेच जलनि:सारण योजनेत समाविष्ट असलेली उद्भवाची कामे, जलशुध्दीकरण केंद्र, उंच/ बैठी पाण्याची टाकी, उर्ध्ववाहिनी, गुरुत्ववाहिनी, वितरण व्यवस्था इत्यादी कामे ही वैशिष्ठपूर्ण पध्दतीची आहेत. प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांची कामे पार पाडण्यात येणारी कामे विशिष्ट प्रकारची असल्यामुळे त्याकरीता नोंदणी नियमावली तयार करुन प्राधिकरणामार्फत कंत्राटदारांना नोंदणी देण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार प्राधिकरणामार्फत कंत्राटदारांना नोंदणी देण्याकरीता नोंदणी नियमावली तयार करुन ती प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सादर करुन त्यास मान्यता घेण्यात येऊन निर्गमित करण्यात आली होती.

तद्नंतर, कंत्राटदार नोंदणी नियमावलीमध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा आणि प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने प्राधिकरणाकडे कंत्राटदाराच्या नोंदणीकरीताची वर्गवारी व त्याकरीता देण्यात आलेले अधिकार व आवश्यक उलाढाल इ.बाबत आवश्यक तो निर्णय घेण्यात आलेला आहे. या सर्व निर्णयांच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्र. १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या विविध परिपत्रकांच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रिय कार्यालयांना यापूर्वीच अवगत करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत प्राधिकरणामार्फत कंत्राटदाराकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची पडताळणी करुन त्या त्या स्तरावरुन नोंदणी देण्यात येत आहे. या प्रकारे नोंदणी देत असतांना कंत्राटदाराने कोणत्याही शासकीय संस्थेकडे, स्थानिक स्वराज्य संस्थेकडे अथवा शासन मान्यताप्राप्त संस्थेकडे स्थापत्य अथवा यांत्रिकी काम पूर्ण केले असल्यास ती कामे त्या त्या वर्गाकरीता १००% गृहित धरली जाऊन कंत्राटदारांचा तीन वर्षातील उलाढालीचा आढावा घेऊन त्याप्रमाणे त्या त्या वर्गात नोंदणी देण्यात येत आहे.

तथापि, प्राधिकरणामार्फत पार पाडण्यात येणारी पाणी पुरवठा तसेच जलनि:सारण योजनेत समाविष्ट असलेली उद्धवाची कामे, जलशुध्दीकरण केंद्र, उंच/ बैठी पाण्याची टाकी, उर्ध्ववाहिनी, गुरुत्ववाहिनी, वितरण व्यवस्था इत्यादी कामे ही वैशिष्ठपूर्ण पध्दतीची आहेत. प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठा व जलनि:सारण योजनांची कामे पार पाडण्यात येणारी कामे विशिष्ट प्रकारची असल्यामुळे अशा प्रकारची वैशिष्ठ्यपूर्ण कामे ज्या कंत्राटदाराने पार पाडली आहेत अशाच कंत्राटदारांची नोंदणी प्राधिकरणाकडे होणे अपेक्षित आहे.

त्याअनुषंगाने विविध तरतुदींचा आढावा घेऊन अहवाल सादर करण्यासाठी संचालक (तांत्रिक) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०१.०८.२०१५ च्या आदेशान्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या प्राप्त अहवालानुसार व कामकाजाच्या अनुषंगाने स्थापत्य तसेच विद्युत व यांत्रिकी वर्गाच्या नोंदणी नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्याचे प्रस्तावित करण्यात येऊन ही बाब प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या दिनांक ०६.१०.२०१५ रोजी संपन्न झालेल्या १३४ व्या बैठकीत कार्यक्रम बाबीव्दारे मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. त्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली असून त्यानुसार अस्तित्वातील प्राधिकरणाच्या नोंदणी नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**नियमावली मधील सुधारणा:**

**अ. स्थापत्य वर्गातील नोंदणी:-**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही विशिष्ट प्रकारची कामे करणारी संस्था असल्याने वर्ग I, IA, II, III, IV व IVA या स्थापत्य वर्गामध्ये नोंदणीसाठी, कंत्राटदाराने ज्या वर्गामध्ये नोंदणीची मागणी केली आहे त्या वर्गासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक सरासरीच्या ५०% इतक्या किंमतीची म्हणजेच आवश्यक असलेल्या एकूण उलाढालीच्या ५०% इतक्या किंमतीची कामे ही पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असणे गरजेचे आहे. तेवढया किंमतीची कामे कंत्राटदाराने पार पाडलेली असली पाहिजेत.

**अथवा**

वर्ग I, IA, II, III, IV व IVA या स्थापत्य वर्गामध्ये नोंदणीसाठी कंत्राटदाराने ज्या वर्गामध्ये नोंदणीची मागणी केली आहे त्या वर्गाच्या दोन टप्पे खाली असलेल्या वर्गातील अनुज्ञेय, कमाल किंमतीचे कमीत कमी एक काम हे पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेले काम कंत्राटदाराने पार पाडलेले असले पाहिजे. (उदा. जर वर्ग-१ मध्ये नोंदणी मिळण्यासाठी अर्ज केला असेल तर वर्ग-२ म्हणजेच रु.७५० लक्ष किंमतीचे काम आणि त्याप्रमाणे पुढील वर्गाकरीता)

२. वर्ग V, VI व VII च्या कंत्राटदार नोंदणी करीता व पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेली कामे कंत्राटदाराने पार पाडलेली नसली तर्री इतर कामे गृहीत धरुन नोंदणी देण्याची कार्यवाही करणेत यावी.

**ब. विद्युत व यांत्रिकी वर्गातील नोंदणी:-**

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही विशिष्ट प्रकारची कामे करणारी संस्था असल्याने **वर्ग अ, ब व क** या विद्युत व यांत्रिकी वर्गामध्ये नोंदणीसाठी कंत्राटदाराने ज्या वर्गामध्ये नोंदणीची मागणी केली आहे त्या वर्गासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक सरासरीच्या ५०% इतक्या किंमतीची म्हणजेच आवश्यक असलेल्या एकूण उलाढालीच्या ५०% इतक्या किंमतीची कामे ही पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असणे गरजेचे आहे. तेवढया किंमतीची कामे कंत्राटदाराने पार पाडलेली असली पाहिजेत.

**अथवा**

**वर्ग अ व ब** या विद्युत व यांत्रिकी वर्गामध्ये नोंदणीसाठी कंत्राटदाराने ज्या वर्गामध्ये मागणी केली आहे त्या वर्गाच्या दोन टप्पे खाली असलेल्या वर्गाच्या, कमाल किंमतीचे कमीत कमी एक काम हे पाणी पुरवठा योजना किंवा मलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेले काम कंत्राटदाराने पार पाडलेले असले पाहिजे. (उदा. जर **वर्ग-अ** मध्ये नोंदणी मिळण्यासाठी अर्ज केला असेल तर **वर्ग-क** म्हणजेच रु.२५/- लक्ष किंमतीचे काम आणि त्याप्रमाणे पुढील वर्गाकरीता)

१. **वर्ग ड व इ** च्या कंत्राटदार नोंदणी करीता व पाणी पुरवठा व जलनि:सारण योजना अथवा या दोन योजनांशी संलग्न असलेली कामे कंत्राटदाराने पार पाडलेली नसली तरी इतर कामे गृहीत धरुन नोंदणी देण्याची कार्यवाही करणेत यावी.

**क. नोंदणी फी:-**

प्राधिकरणामार्फत स्थापत्य नोंदणी शुल्कापोटी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

| क्र. | नोंदणीचा वर्ग | आकारण्यात येणारे शुल्क (रुपये) | आकारावयाचे शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | वर्ग - १ | ३०,०००/- | ४०,०००/- |
| २ | वर्ग - १अ | २०,०००/- | ३५,०००/- |
| ३ | वर्ग- २ | ९,०००/- | ३०,०००/- |
| ४ | वर्ग- ३ | ७,५००/- | २५,०००/- |
| ५ | वर्ग- ४ | ६,०००/- | २०,०००/- |
| ६ | वर्ग-४ अ | ५,०००/- | १५,०००/- |
| ७ | वर्ग-५ | ४,०००/- | १०,०००/- |
| ८ | वर्ग-६ | २,०००/- | ५,०००/- |
| ९ | वर्ग-७ | १,०००/- | ३,०००/- |

तसेच प्राधिकरणामार्फत विद्युत व यांत्रिकी नोंदणी शुल्कापोटी आकारुण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

| क्र. | नोंदणीचा वर्ग | आकारण्यात येणारे शुल्क (रुपये) | आकारावयाचे शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | वर्ग - अ | ५,०००/- | १५,०००/- |
| २ | वर्ग - ब | ३,०००/- | १०,०००/- |
| ३ | वर्ग - क | २,०००/- | ७,५००/- |
| ४ | वर्ग - ड | १,०००/- | ५,०००/- |
| ५ | वर्ग - ई | ५००/- | १,०००/- |

उपरोक्त बदलांव्यतिरिक्त कंत्राटदार नोंदणी व नुतनीकरणाबाबत इतर प्रचलित नियम पुढेही लागू राहतील. उपरोक्त सूचनांचे सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

(संतोष कुमार)
सदस्य सचिव

जा. क्र. मजीप्रा/सस/भांडार शाखा/नोंदणी/ १२१८
दिनांक: २१.११.२०१५

**माहितीसाठी व कार्यवाहीसाठी:-**

प्रत: संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे.
प्रत: संचालक (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
प्रत: मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ____________
प्रत: अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ____________
प्रत: मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
प्रत: कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ____________